ठाणे महानगरपालिका,

वृक्षप्राधिकरण

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३) अन्वये

## जाहीर सूचना

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यानुसार इमारत बांधकाम परवानगी देण्यास सक्षम प्राधिकरण / शहर विकास विभागाने अर्जदार मे.डिझाईन कन्सोटीयम, वा.वि., यांच्या मौजे पाचपाखाडी, माजिवडे, ठाणे येथील सेक्टर क्र.४, ठाणे येथील वर्तकनगर म्हाडा वसाहतीमधील इमारत क्र.२७ व २८, स.नं.२०६/१(पार्ट), २२९/२(पार्ट), ठाणे या ठिकाणवरील इमारत बांधकामाच्या प्रस्तावास विकास प्रस्ताव क्र.एस०४/००७२/१५ दि.१५/०३/२०१७ अन्वये Permission देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी विकास प्रस्तावांतर्गत मंजुर नकाशे / आराखडे यामधील **नियोजित इमारत** / रस्ता मध्ये बाधित होणा-या वृक्षांपैकी जे वृक्ष तांत्रिकदृष्टया पुनर्रोपण करणे शक्य असणारे वृक्ष पुनर्रोपण करणे व तांत्रिकदृष्ट्या पुनर्रोपण करण्यास अशक्य असणारे वृक्ष तोडणे याकरीता वर नमूद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर केला आहे.

ज्याअर्थी, वृक्षप्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ दिवस कालावधीमध्ये हरकती तथा सुचना मागविण्याचे सुचित केले आहे.

त्याअनुषंगाने वर नमुद अर्जदार यांनी विकास प्रस्ताव अंतर्गत बाधित १७ वृक्ष पुनर्रोपण करणे व ०१ वृक्ष तोडणे या अर्जाच्या अनुषंगाने सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सूचना असल्यास लेखी स्वरुपात ठाणे महानगरपालिकेचे नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, प्रशासकीय भवन, डॉ. अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे (प.) येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती तथा सूचना ग्राह्य राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(केदार पाटील)
वृक्ष अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे.